महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण व आयुष, महाराष्ट्र राज्य
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

File No.: DMER-११०१८/१३/२०२२-CETIT दिनांक-5-9-24.

प्रति,
मा. महाव्यवस्थापक,
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ,
अेपीजी हाऊस, तिसरा मजला, दिनशॉ वाच्छा रोड,
के.सी.कॉलेज जवळ, मुंबई-४०० ०२०.

विषय- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेतर्गंत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करण्याकरीता अंतिम मुदत वाढ मिळणेबाबत

संदर्भ- १. संचालनालयाचे पत्र क्र.DMER/११०१८/१३/२०२२-CETITI यांचे दि.२९.०७.२०२४
२. संचालनालयाचे पत्र क्र.सवैशिवसं/महाडीबीटी/शिष्यवृत्ती/८-अ, यांचे दि.०९.०८.२०२४

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनेतर्गंत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सन २०२३-२४ हया शैक्षणिक वर्षात महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करण्याकरीता दिनांक १५.०७.२०२४ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. पंरतू ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुंबई, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, संभाजीनगर, लो.टी.म.वै.म.सायन मुंबई येथील वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करण्यास पुरेसा वेळ मिळाला नसल्यामुळे महाडिबीटी पोर्टलवर अर्ज सादर करु शकलेले नाही. त्याकरीता संबंधित वैद्यकीय महाविद्यालयांनी या संचालनालयास विनंती केलेली आहे.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ १ व २ च्या पत्रान्वये सन २०२३-२४ हया शैक्षणिक वर्षात महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करण्याकरीता दिनांक १५.०८.२०२४ पर्यंत मुदत वाढविण्याची विनंती करण्यात आलेली होती. तरी ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुंबई, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, संभाजीनगर, लो.टी.म.वै.म.सायन, मुंबई येथील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज सादर करण्यास पुरेसा वेळ मिळाला नसल्यामुळे

महाडिबीटी पोर्टलवर अर्ज सादर करणे शक्य झालेले नाही. अशा विद्यार्थ्यांना महाडिबीटी पोर्टलवर अर्ज सादर करण्याची अंतिम दिनांक ३०.०९.२०२४ पर्यंत वाढविण्यात यावी अशी विनंती करण्यात येत आहे.

आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
मुंबई